राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६१२४ ते ६१२८/२०२६

किशोर ठकसेन भिडे,
सर्व्हे नंबर, ४७/१/१२, प्लॉट नंबर ०९,
तिसरा मजला, साईदिप अपार्टमेन्ट,
धनलक्ष्मी सोसायटी, सुनिता नगर,
वडगांवशेरी पुणे – ४१००१४.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय,
२ रा मजला, बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय,
२ रा मजला, बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>

अपीलकर्ता	:	उपस्थित(ऑनलाईन)
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

अपिलार्थीनी दाखल केलेल्या उपरोक्त सर्व प्रकरणांमध्ये तत्कालीन अपिलीय अधिकाऱ्यांनी या आधीच अपिलार्थीना लवकरात लवकर माहिती उपलब्ध करून देण्याबाबत सूचित केले असतानाही अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केले असून त्यात आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे पुणे येथून ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाले असून दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ रोजी दाखल केलेल्या प्रस्तुत द्वितीय अपील अर्जाची आज पहिल्यांदा सुनावणी असल्याचेही अपिलार्थीनी नमूद केले आहे.

यामध्ये आज इलाका शहर विभाग येथील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत. तसेच याप्रकरणी तत्कालीन अपिलीय अधिकारी श्रीमती मंजुषा कुलकर्णी यांनी दिनांक २० मे, २०२२ रोजी आधीच सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थीच्या बाजूने सकारात्मक आदेश पारित केला असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, इलाका शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई श्रीमती मंजुषा कुलकर्णी यांनी पारित केलेल्या

उपरोक्त आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याच्या निर्देशासह तसेच या विलंबास दिनांक १८ मे, २०२२ ते आज पर्यंत जबाबदार असणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्याविरुद्ध **कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये अधिकतम शास्ती कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा सादर करण्याच्या निर्देशासह तसेच वरील खुलासा सादर करण्याची संधी ही कलम २० (१) मधील नमूद नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार प्रदान करण्यात येत असल्याची जाणीव करून देत प्रस्तुत सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत. या आदेशाची अंमलबजावणी वरील आदेश प्राप्त झाल्यानंतर दोन आठवड्याच्या आत करून त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.**

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

२. **अपिल क्र. ६१२४ ते ६१२८/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १५-०७-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**